# शहर अभियंता विभाग

**विभागाची प्रस्तावना** :- छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका क्षेत्रांतर्गत विकसित करण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पासाठी निधीची उपलब्धता करून नियोजनानुसार रस्ते प्रकल्पविकसित करणे , विकसित प्रकल्पांची वेळोवेळी देखभाल दुरुस्ती बाबत निर्णय घेणे.

शहराच्या विस्तारीकरणाची बाब पाहता शहरालगत वाहतूक रहदारी वाढली आहे यामुळे शरीरातील अस्तित्वातील **रस्ते** मंजूर विकास योजना आराखड्यानुसार विकसित करणे गरजेचे ठरत आहे तथापि शहर व शहरालगत रोड नेटवर्क कनेक्टिव्हिटी बळकट करण्याच्या दृष्टीने प्रशासनातर्फे प्रामुख्याने विविध विकास योजनेत असते विकसित करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे या नियोजनाच्या वेळी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता पुरेसा निधी उभा करणे महानगरपालिकेला शक्य होत नाही यासाठी शासन स्तरावर निधीची उपलब्धता शासनामार्फत करून प्राप्त निधीच्या मर्यादेत रस्ते प्रकल्पांची निविदा पूर्व निविदा पश्चात कामे करण्यात येतात.

रस्त्याच्या विकासाबाबत शहरांतर्गत विविध प्रकल्पांचा प्रकल्पांचा वेळोवेळी आढावा घेऊन दर्जा व गुणवत्तेबाबत आवश्यक सूचना करण्यात येतात .पावसाचे पाणी निचरा होण्यासाठी रस्त्यालगत स्टॉर्म वॉटर ड्रेन तयार करून घेणे, शहरातील नागरीकांना चांगले रस्ते उपलब्ध करून ,खड्डेमुक्त रस्ते असावेत यासाठी पॉटहोल बुजवून घेऊन,त्यासाठी आवश्यकतेनुसार पॅचवर्क करण्यात येते .

शहर सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने प्रमुख चौकात सुबक वाहतूक बेटे उभारून ,नागरीकांच्या सुरक्षित व सुखकर प्रवासासाठी प्रमुख रस्त्यांवर आवश्यकतेनुसार पादचारी पथ, दुभाजक,झेब्रा क्रॉसिंग,दिशादर्शक फलक लावणे , जेणेकरून शहरातील दळणवळण सुयोग्य पद्धतीने होते.

छत्रपती संभाजीनगर **शहरास पाणी पुरवठा** हा पैठण येथील जायकवाडी जलाशयावरुन महानगरपालिकेमार्फत कार्यान्वीत असलेल्या 56 दलली व 100 दलली या दोन पाणी पुरवठा योजनेवरुन जवळपास 140 दलली अशुद्ध पाणी उचल करण्यात येतो. तसेच या दोन्ही योजना मिळुन सर्वसाधारणपणे दररोज 130 दलली शुद्ध पाण्याचा शहरास पुरवठा केला जातो.तसेच सद्यस्थितीत 56 दलली पाणी पुरवठा योजना पुन:र्जीवीत करणे अंतर्गत जुने जायकवाडी, नवीन फारोळा तसेच नक्षत्रवाडी

पंपगृह येथे 422 अ.श. पंप बसवुन शहरास येणा-या पाण्यामध्ये सर्वसाधारणपणे 20 दलली पाण्याची वाढ करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेतील पाणी पुरवठा जायकवाडी यांत्रिकी या विभागामार्फत वरील दोन्ही पाणी पुरवठा योजनेवरील जायकवाडी ते शहरापर्यंत असलेल्या जायकवाडी (जुने व नविन), ढोरकीन, फारोळा (जुने व नविन), नक्षत्रवाडी अशा एकुण 6 पंपगृहांचे तसेच फारोळा येथील रिसायक्लींग पंपगृह व फिल्ट्रेशन प्लॅन्ट येथील यांत्रिकी व विद्युत मशिनरीची देखभाल वेळो वेळी  दुरुस्ती करण्यात येते. तसेच महानगरपालिकेची उद्याने, आरोग्य केंद्रे, शाळा व इतर ठिकाणी असलेल्या विंधन विहिरी, विहिरींवरील विद्युत पंपांची व शहरातील विविध भागात असलेल्या एकुण 1262 हातपंपांच्या देखभाल दुरुस्तीचे  काम या विभागामार्फत करण्यात येते.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचा **यांत्रिकी विभाग** हा आपत्कालिन विभाग असून, यांत्रिकी विभागात विविध प्रकाराची एकूण 211 वाहने / मशीनरी कार्यरत आहेत. या विभागाद्वारे मनपाच्या 10 मनपा झोन कार्यालय ,अग्शिमन, उद्यान, आरोग्य , पशुसंवर्धन , पाणीपुरवठा , ड्रेनेज, इत्यादी विभागांना आवश्यक त्यातेळी वाहने / मशीनरी पुरविण्यात येतात. या व्यतिरीक्त सांस्कृतिक कार्यक्रमे, धार्मिक कामे इत्यादी साठी शुल्क भरुन मोबाईल टॉयलेट व्हॅन उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच जेटींग मशीन ,व्हॅक्यूम मशीन ,वॉटर टँकर, रोड रोलर ,ॲम्बुलन्स, जेसीबी मशीन, पोकलेन इत्यादी नागरिकांच्या खाजगी कामासाठी शुल्क आकारुन नागरिकांना सुविधा दिल्या जातात.

शहरातील नागरिकांना **जलनिःस्सारण** प्रकल्पांची तांत्रिकदृष्ट्या अंमलबजावणी करण्यात येते. शासन निधी, महानगरपालिका निधी, शासनाच्या विविध योजना इत्यादी अंतर्गत जलनिःस्सारण प्रकल्प राबविले जातात

शहरा अंतर्गत जलनिःस्सारण वाहिनी टाकणे, दुरुस्ती करणे, घरगुती मलजलाची मुख्य जलनिःस्सारण वाहिनीस जोडणी करणे, No Network भागात जलनिःस्सारण वाहिनी टाकणे इत्यादी मूलभूत सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्याचे काम होते, आणि जलनिःस्सारण प्रकल्प, चोकअप व देखभाल व दुरुस्ती करण्यात येते .

शहरातील नागरिकांना मूलभूत सेवा व सुविधा पुरविण्याच्या ::दृष्टीने विविध **इमारतीचे** प्रकल्प या विभागाअंतर्गत हाती घेतले जातात. शासन निधी, जिल्हा नियोजन निधी, महानगरपालिका निधी, शासनाच्या विविध योजना इत्यादी अंतर्गत इमारत प्रकल्पांची कामे राबविले जातात. ज्यामधे स्वच्छतागृहे, आरोग्य केंद्र,

स्मशानभूमी, वाचनालय, वस्तीगृह, दिव्यांग भवन, संविधान भवन इत्यादी मूलभूत सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्याचे काम या विभागामार्फत होते. तसेच या शहराच्या सर्वांगीण व शाश्वत विकासाकरिता क्रीडा संकुल, व्यापारी संकुल, विविध म्युझियम विकसित करण्याचे काम या विभागाअंतर्गत केले जाते.

**BOT** (**Build-Operate-Transfer**) प्रकल्प हे एक सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) मॉडेल आहे, जे मुख्यतः पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या विकासासाठी वापरले जाते. या मॉडेलमध्ये तीन प्रमुख टप्पे असतातः

हा मॉडेल सरकारला खाजगी क्षेत्राच्या तज्ज्ञतेचा आणि वित्तीय संसाधनांचा लाभ घेण्याची संधी प्रदान करतो, तर खाजगी क्षेत्राला ऑपरेशनल कालावधीत महसूल मिळवण्याचा फायदा होतो.

सारांश, **BOT प्रकल्प** हे मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी एक उपयुक्त साधन आहे, ज्यामुळे सरकार आणि खाजगी कंपन्यांमध्ये सहकार्य होत.

छत्रपती संभाजीनगरच्या नागरीकांना चांगल्या सुविधा देण्याच्या दृष्टीने **विद्युत** पथदिव्यांच्या पायाभूत सुविधांचे जीर्ण होत असलेले पोल, केबल, पॅनल वोर्ड जंक्शन बॉक्स इत्यादी वावींचे नुतणीकरण करणे आवश्यक झाले, कारण वारंवार पावसाळयात यामुळे अपघात होऊन जिवीत किंवा वित्तहानी होत असल्यामुळे पायाभुत सुविधांचे नुतणीकरण तसेच शासनाच्या ऊर्जा बचतीच्या धोंरणामुळे सर्व जुने पथदिवे एल.ई.डी करण करणेसाठी बी.ओ.टी. तत्वावर कार्यान्न्वयीत आहेत .

महानगरपालिका हद्दीतील इमारतीची विद्युत व्यवस्था देखभाल दुरुस्ती चे एकुण 42 वाहतुक संकेतांकाचे देखभाल दुरुस्तीचे काम करण्यात येत आहे. शहरात एकुण 76000 पथदिवे असुन एल.ई.डी. प्रकल्पाअंतर्गत 60000 पथदिवे लावण्यात आल्या आहेत. विजेची Consumption कमी होवुन विज बचत 40% झाली आहे. BOT प्रकल्प फेज-2 अंतर्गत शहरातील विविध ठिकाणी पथदिवे वसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

- तसेच शहरात सोलार यंत्रणा आणि EV Charging Station स्थापित करण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे. सोलार यंत्रणा स्थापित करण्याकरीता अपांरपारीक ऊर्जेवर अवलंबुन न राहता पारंपारीक यंत्रणेचा वापर करण्यासाठीचे धोरण ठरविण्यात आले आहे

## ०१ अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य - नाव , कामाचे स्वरुप व संपर्क क्रमांक

| अ.क्र | अधिकारी / कर्मचारी यांचे नाव | कामाचे स्वरुप | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१ | **श्री ए. बी .देशमुख , शहर अभियंता** (**निवृत्त**) | छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका क्षेत्रांतर्गत रस्ते,पाणीपुरवठा,जलनि:स्सारण,बीओटी,विद्युत तसेच यांत्रिकी संदर्भाने विकासाची सर्व कामांना तांत्रिक मान्यता प्रदान करणे देखभाल दुरुस्तीबाबत निर्णय घेणे | 9764999570 |
| ०२ | **श्री सुहास जोशी , उप अभियंता** (**निवृत्त**) | ➢ छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका क्षेत्रांतर्गत रस्ते,पाणीपुरवठा,जलनि:स्सारण,बीओटी,विद्युत तसेच यांत्रिकी संदर्भाने विकासाची सर्व कामे प्रस्तावित करणे व विकसित कामांच्या देखभाल दुरुस्तीबाबत सर्व कार्यकारी अभियंता तसेच वॉर्ड अभियंता यांच्याशी समन्वय साधून कार्यालयीन प्रक्रिया योग्यरीत्या पार पाडणे.<br>➢ स्वविकास (Self Development) च्या कामाच्या प्रस्तावास अंतिम मान्यता देणे .<br>➢ विभागातील प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवणे . | 9764999587 |
| ०३ | **श्री उदय वसंतराव मोकाशी अधिक्षक** | विभागांतर्गत प्राप्त होणाऱ्या संचिके संदर्भात अर्थसंकल्पीय तरतुदी व नोंदी तसेच प्राप्त होणाऱ्या देयकाच्या तरतुदी, नोंदी संदर्भात संचिकांची छाननी व तपासणी करणे व शहर अभियंता यांचेकडे सादर करणे, याबाबतच्या संगणकीय नोंदी करणे, विभागातील कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे व त्यांच्याकडून निर्देशीत कामे करुन घेणे. | 9823189263 |
| ०४ | **श्री संजय प्रभाकर कपाळे , अनुरेखक** | छत्रपती संभाजी नगर शहराच्या हद्दीमध्ये शहर अभियंता विभागाअंतर्गत होणाऱ्या विकास कामात समानता सुलभता व अचूकता आणणे ,<br>➢ प्रचलित विकासाचा वेग व नियोजनाचा वेग यामध्ये सुसंगती राखण्याच्या साठी ,<br>➢ तसेच करण्यात येणाऱ्या कामात सर्वकष कार्यपद्धतीने करण्यासाठी येणाऱ्या कामास लागणारा विलंब कमी होऊन कमी वेळात जास्तीचे कामे व विस्तृत माहिती प्राप्त करू घेण्यासाठी<br>**GIS Platform** या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कामात सुलभता आणणे .<br>➢ ऑनलाइन ची सर्व कामे पाहणे . | 9422712301 |
| ०५ | **श्री मंदार महेश मुटाटकर ,** | १. शहर सौंदर्याकरण योजना अंतर्गत प्राप्त प्रकरणांची छाननी तपासणी करुन मंजुरीस्तव सादर करणे | 8263978730 |

| | | | |
|---|---|---|---|
| | **कनिष्ट अभियंता** | २. स्वविकास (Self Development) च्या कामाचे प्रस्तावाची अदाजपत्रक तयार करणे<br>३. शहर अभियंता यांनी वेळोवेळी आदेशीत केलेली कामे पार पाडणे | |
| ०६ | **कु.पुजा दिगंबर भोंबे**<br>**कनिष्ट अभियंता** | १. शहर सौंदर्याकरण योजना अंतर्गत प्राप्त प्रकरणांची छाननी तपासणी करुन मंजुरीस्तव सादर करणे<br>२. स्वविकास (Self Development) च्या कार्माचे प्रस्तावाची अदाजपत्रक तयार करणे<br>३. शहर अभियंता यांनी वेळोवेळी आदेशीत केलेली कामे पार पाडणे | 9767712420 |
| ०७ | **श्री हेमंत रामसिंग देवरे ,**<br>**वरिष्ठ लिपिक** | कार्यकारी अभियंता रस्ते, कार्यकारी अभियंता इमारत व उद्याने व कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभागाशी संबंधीत प्राप्त होणाऱ्या संचिका नोंदणी आवक जावक, प्राप्त संचिकांच्या तांत्रिक मंजुरीची नोंद घेणे, | 9371717115 |
| ०८ | **श्री मंगेश महेंद्र यादव ,**<br>**वरिष्ठ लिपिक** | १. दैनंदिन टपाल आवक जावक प्रकरणे<br>२. कार्यकारी अभियंता यांत्रिकी, कार्यकारी अभियंता विद्युत व कार्यकारी अभियंता जलनिःसारण विभागाशी संबंधीत प्राप्त होणाऱ्या संचिका नोंदणी आवक तांत्रिक मंजुरीची नोंद घेणे, जावक, प्राप्त संचिकांच्या<br>३. विविध माहित्यांचे संकलन करणे (संचिका तयार करणे)<br>४. विभागास प्राप्त माहिती आधारे शहर अभियंता विभागाची माहिती तयार करणे कामी अधिक्षक व उप अभियंता यांना सादर करणे.<br>५. भांडार विभागात साहित्याची मागणी करणे व मुख्य भांडारविभागातून प्राप्त साहित्याच्या नोंदी घेणे.<br>६. विविध विभागाच्या माहितीचे संकलन करणे<br>७. शहर अभियंता यांनी वेळोवेळी आदेशीत केलेली कामे करणे, | 9404988468 |

## ४. विभागातील कार्यवाही अंतर्गत प्रकल्प

| | |
|---|---|
| १ | महानगरपालिका क्षेत्रांतर्गत रस्ते,पाणीपुरवठा,जलनिःस्सारण,बीओटी,विद्युत तसेच यांत्रिकी विभागांतर्गत विकासाची सर्व कार्यवाही अंतर्गत प्रकाल्पे. |

## ५. विभागातील पुर्ण झालेले प्रकल्प

| | |
|---|---|
| १ | महानगरपालिका क्षेत्रांतर्गत रस्ते,पाणीपुरवठा,जलनिःस्सारण,बीओटी,विद्युत तसेच यांत्रिकी विभागांतर्गत विकासाची सर्व पुर्ण झालेले प्रकाल्पे. |

## ६ .विभागातील प्रस्तावित प्रकल्प

| | |
|---|---|
| १ | महानगरपालिका क्षेत्रांतर्गत रस्ते,पाणीपुरवठा,जलनिःस्सारण,बीओटी,विद्युत तसेच यांत्रिकी विभागांतर्गत विकासाची सर्व प्रस्तावित प्रकाल्पे. |